# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २२ नोव्हेंबर २०२२

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५७३/२०२२ भादंविसक ४२०, माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(ड) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १६/११/२०२२ रोजी ते दि. १७/११/२०२२ रोजी पर्यंत फियादीचे घरी, सोलापूर येथे ऑनलाईन |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/११/२०२२ रोजी १६.२२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सनाउल्ला मुजमिल सय्यद, वय- ३२ वर्षे, रा. प्लॅट नं. ०८, आयेशा टॉवर, तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | मोबाईल क्रं. ७००५०८५३०३, ९३१९११२०२६ चा धारक नाव पत्ता माहित नाही |
| **फसवणुक र** | : | ५,७०,०००/- रुपये |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे मोबाईल क्रमांकावर वरील आरोपीत मोबाईल क्रमांक धारकाने जॉब पाहिजे आहे का असा प्रथम मेसेज आला. फिर्यादी यांनी जॉबची आवश्यकता असल्याने त्यांनी हो असे सांगितल्यावर त्यांना ऑनलाईन व्हॉटस ॲप व टेलिग्राम वरुन इंस्टाग्रामचे सांगितले अकाऊंट धारकाचे फॉलोओवर वाढविण्याचे http://www.cayprobe.cc या वेबसाईटवर ट्रेडींग करुन कमिशन मिळविणे असे काम असल्याचे सांगुन त्यापुर्वी त्यांनी दिलेले विविध अकाऊंटवर पैसे जमा करावे लागतील सांगितल्याने फिर्यादी यांनी आरोपीतांनी १) एस बँक बोरीवली, मुंबई, २) एस बँक एस व्ही रोड, खार, मुंबई, ३) आयसीआयसीआय बँक मंडी राज्य हरियाणा येथील बँकांचे अकाऊंट नंबर देवून त्यामध्ये वेळोवेळी एकुण ५,७०,०००/- रु ऑनलाईन जमा करण्यास सांगितले. फिर्यादी यांनी रक्कम जमा केली व त्यांनी दिलेला जॉब पुर्ण केला. त्यानंतर फिर्यादी यांनी केलेल्या कामाचा मोबदला व भरलेली मुद्दल रक्कम परत मागितली असता वरील आरोपीताने फिर्यादीस तुम्हाला पुढील टास्कसाठी ४,४८,०००/- रु भरावे लागतील नाहीतर तुम्हाला तुमचे कमिशन व मुद्दल रक्कम मिळणार नाही असे सांगितले तेव्हा फिर्यादी यांची फसवणुक झाल्याची खात्री झाल्याने फिर्यादीची वरील आरोपीताविरुध्द तक्रार आहे म्हणून. तपास:- पोनि/ करणकोट - **८८७९९७०६०८८** |

## सलगरवस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १८४/२०२२ भादंविसक ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १५/१२/२०१४ रोजी फिर्यादीचा विवाह झाल्यानंतर अडीच वर्षापासुन, मु. नरोटेवाडी, पो. मार्डी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/११/२०२२ रोजी १८.०७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ. वैष्णवी योगेश उंबरे, वय- २६ वर्षे, रा. मु. नरोटेवाडी, पो. मार्डी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर, सध्या- मु.पो. बेलाटी, अंगणवाडी, शाळेजवळ, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) योगेश दत्तात्राय उंबरे- पती, २) दत्तात्राय लिंबाजी उंबरे- सासरे, ३) लक्ष्मीबाई दत्तात्राय उंबरे- सासु |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे दि. १५/१२/२०१४ रोजी यातील आरोपीत क्रं. १ योगेश उंबरे याचे सोबत लग्न झाले आहे. लग्न झाल्यानंतर अडीच वर्षानंतर सासरकडील लोकांनी फिर्यादीस छोटया छोटया गोष्टीवरुन त्रास देवू लागले. त्यानंतर वरील आरोपीतांनी मिळुन फिर्यादीस सतत घरातील किराणा माल आणण्याकरीता माहेरुन पैसे आणण्यास भाग पाडत होते व छोटा हत्ती मालवाहतुक वाहन आणण्याकरीता माहेरुन वडीलांकडुन शेतीचे कागदपत्रे बँकेत ठेवण्याकरीता आण म्हणून फिर्यादीस आतोनात त्रास देवून हाताने मारहाण केली व वडीलांकडुन शेतीचे कागदपत्रे आण नाहीतर औषध पिवुन जिवे देतो म्हणून धमकी देवून फिर्यादीस माहेरी पाठविले व परत नांदवण्यास नेले नाही म्हणून फिर्यादीची वरील आरोपीतांविरुध्द कायदेशीर तक्रार आहे. तपास:- पोना/ १३८२ क्षिरसागर |